February - 2020 (10)

मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. 10 मा. अ.
दिनांक: 26/2/2020

10 रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

## जोडपत्र "अ"

[नियम ३ पहा ]

**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ अन्वये माहिती मिळवण्याच्या अर्जाचा नमुना**

प्रति,
राज्य जन माहिती अधिकारी,
विधी विभाग, मिरा भाईंदर महानगर पालिका,
स्व. इंदिरा गांधी भवन , भाईंदर [पश्चिम], ता.जि. ठाणे ४०११०१.

१. **अर्जदाराचे नाव** :- प्रमोद पांडुरंग पाटील

२. **पत्ता** :- ई -६०१, होली कॉम्प्लेक्स सह.गृह.संस्था मर्यादित, थुंगा रुग्णालयाच्या शेजारी,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,मिरा रोड [पूर्व ], ठाणे ४०११०७. महाराष्ट्र , भ्रमणध्वनी :- ९८२००११३७६

३. **आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील** :-

[एक] **माहितीचा विषय** :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेतील वर्ग '१' शहर अभियंता पदावर पदोन्नतीने गेलेल्या श्री. शिवाजी बारकुंड यांच्या पदोन्नतीबाबत न्यायालयीन स्थगिती प्रक्रियेच्या संदर्भात कार्यवाही

[दोन] **माहितीचा कालावधी** :- मिरा भाईंदर महानगरपालिका स्थापनेच्या दिनांकापासून ते 24-02-2020 पर्यंत

[तीन ] **आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेतील वर्ग '१' शहर अभियंता पदावर पदोन्नतीने गेलेल्या श्री. शिवाजी बारकुंड यांच्या पदोन्नतीबाबत न्यायालयीन स्थगिती प्रक्रियेच्या संदर्भात कार्यवाहीच्या तपशीलासंदर्भात माहिती खालीलप्रमाणे मिळावी

[1] मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेतील वर्ग '१' शहर अभियंता पदावर पदोन्नतीने गेलेल्या श्री. शिवाजी बारकुंड यांच्या पदोन्नतीबाबत त्यांनी घेतलेल्या न्यायालयीन स्थगिती प्रक्रियेच्या संदर्भात विधी विभागाच्या नस्तीतील सर्व उपलब्ध कागदपत्रे,शेरे,हस्तलिखित टिपण याची छायांकित प्रत मिळावी.

[2] सदर प्रकरणात महानगरपालिकेच्या विधी विभागाच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळावी.

[3] श्री. शिवाजी बारकुंड यांच्या पदोन्नतीसंदर्भात महाराष्ट्र शासनाने केलेल्या पत्रव्यवहार/ निर्णय याची छायांकित प्रत मिळावी ?

[4 ] सदर प्रकरणात मागील कोणत्या तारखांना महानगरपालिकेच्या वतीने आपल्या विभागाचा प्रतिनिधी उपस्थित होता ? [प्रतिनिधींचे नाव, पदनाम ]

[5] सदर प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे? सदर स्थिती मागील किती कालावधीपासून जैसे थे आहे ?

[6] महानगरपालिकेच्या वतीने न्यायालयीन कामकाजात सदर प्रकरण हाताळणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव आणि पदनाम याची माहिती मिळावी,

[7] मा, न्यायालयाने या प्रकरणात दिलेल्या स्थगिती आदेशाची तसेच इतर निर्णयांची छायांकित प्रत मिळावी

[चार] माहिती टपालाद्वारे हवी आहे कि व्यक्तीशः हवी आहे व्यक्तीशः

[प्रत्यक्ष टपालखर्च अतिरिक्त फी मध्ये समाविष्ट करण्यात येईल ]

[पाच ] टपालाद्वारे हवी असल्यास , ----------------

[सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र ]

४. अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे

[असल्यास त्याबाबतच्या पुराव्याबाबतची छायांकित प्रत जोडावी ------------------

ठिकाण :- मिरा रोड, ठाणे

दिनांक :- 24-02-2020

अर्जदाराची सही

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./१९/२०२०
दि. २८/०२/२०२०

प्रति,
**श्री. प्रमोद पाटील**
ई/६०१, होली कॉम्प्लेक्स सह गृह सं. मर्या.
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, रेमन्ड शो रुम नजीक
मिरा रोड (पुर्व) जि. ठाणे. ४०१ १०७.

**विषय :-** केंद्रशासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज.

**संदर्भ :-** आपला दि. २४/०२/२०२० रोजीचा अर्ज.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय अर्जान्वये आपण मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेतील वर्ग-१ शहर अभियंता या पदावरील श्री. शिवाजी बारकुंड यांच्या पदोन्नतीबाबत न्यायालयीन प्रकरणाची माहिती अपेक्षिली आहे. तरी आपणास खालील मुद्यांनुसार माहिती उपलब्ध करुन देत आहे.

**मुद्दा क्र. १ व ३ :-** सदर मुद्यांकरीता रिट याचिका क्र. ६१५१/२०१५ ची प्रत व त्यासोबतची सर्व कागदपत्रे देत आहे. **(एकुण ६० प्रती)**

**मुद्दा क्र. २ :-** सदर याचिकेत मनपामार्फत मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या शपथपत्राची प्रत देत आहे. **(एकुण ०४ प्रती)**

**मुद्दा क्र.** ४ :- सदर याचिकेत मनपाच्या वतीने ॲड. नारायण बुबना हे कामकाज पाहत आहेत.

**मुद्दा क्र.** ५ :- सदर याचिकेत मा. उच्च न्यायालयाने दि. ०३/०७/२०१५ रोजी जैसे थे आदेश पारीत केलेले आहेत. सदरचे आदेश आजपर्यंत अस्तित्वात असून सदरची मा. उच्च न्यायालयात सुनावणीकरीता प्रलंबित आहे.

**मुद्दा क्र. ६ :-** सौ. सई वडके, विधी अधिकारी

**मुद्दा क्र. ७ :-** सदर याचिकेत मा. उच्च न्यायालयाने दि. ०३/०७/२०१५ रोजी जैसे थे आदेश पारीत केलेले आहेत. सदर आदेशाची प्रत देत आहे. (**१ प्रत**) अधिक आदेशाच्या प्रती मा. उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेण्यात याव्यात.

सदरच्या एकुण ६५ प्रतींकरीता रु. २/- प्रमाणे रु. १३०/- चा विधी विभागाकडे भरणा करुन सदरची माहिती उपलब्ध करुन घेण्यात यावी.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास श्री. सुनिल लहाने, मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

प्रमोद पाटील मिलिंद तावडे यांचे प्रतिनिधी

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

C:\Users\Phatak\Desktop\D Data\MAHITI ADHIKAR\Pramod Patil.doc